**कृपया प्रसिद्धीसाठी** **21 नोव्हेंबर 2011**

## राम नाईक यांच्या खासदार निधीतून बांधलेल्या
## मालाड, बोरीवलीतील प्रवासी बस स्थानकांचे पुनर्निर्माण

**मुंबई, सोमवार :** माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांच्या खासदार निधीतून बाहेरगावी जाणा-या प्रवाशांसाठी मालाड व बोरीवली येथे बांधण्यात आलेल्या प्रवासी बस स्थानकांचे पुनर्निर्माणानंतर दोन भव्य समारंभांद्वारे उद्‌घाटन झाले. यावेळी बोलताना श्री. राम नाईक म्हणाले,''रस्त्यावर शेकडो प्रवाशांसाठी एका सरकारी योजनेमार्फत उभा केलेला प्रकल्प रस्ता रुंदीकरणासाठी तोडल्यानंतर तो पुन्हा उभारुन देणे ही एमएमआरडीएची नैतिक जबाबदारी आहे. 1996 मध्ये माझ्या खासदार निधीतून पश्चिम द्रुतगती मार्गावर मालाड व बोरीवली येथे बांधलेली बस स्थानके एमएमआरडीएने बेधडक तोडल्यानंतर ती पुन्हा बांधून दिली पाहिजेत अशी आग्रही मागणी मी केली. महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान येथे जाणा-या शेकडो प्रवाशांची यामुळे होणारी गैरसोय दूर झाली पाहिजे अशी यामागे भूमिका होती. अखेर एमएमआरडीएने ती मानली. 1996 मध्ये प्रत्येकी रु. 6.50 लाख खर्चून ही बस स्थानके बांधण्यात आली होती. बांधलेल्या प्रवासी बस स्थानकांचे पुनर्निर्माण करताना एमएमआरडीएने मालाड येथे रु. 14 लाख, तर बोरीवली येथे रु.13 लाख खर्च केले. आता ही प्रवासी बस स्थानके महाराष्ट्रातील आदर्श बस स्थानक वाटतील असे काम झाले पाहिजे.''

या दोन्ही प्रवासी स्थानकांची व्यवस्था जागृती केंद्र ही सामाजिक संस्था बघणार आहे. संस्थेचे अध्यक्ष व नगरसेवक डॉ. राम बारोट यांनी यावेळी आधीची बस स्थानके तोडल्यामुळे नागरिकांची जी गैरसोय होत होती ती आता यापुढे होणार नाही याबद्दल समाधान व्यक्त केले.

सत्तेत किंवा पदावर नसतानाही एखाद्या समस्येचे इच्छा असेल तर कसे निराकरण होऊ शकते याचे ही बस स्थानके मूर्तीमंत उदाहरणे आहेत, असे मत यावेळी बोलताना आमदार श्री. योगेश सागर यांनी व्यक्त केली. आमदार श्री. गोपाळ शेट्टी म्हणाले,''एमएमआरडीएने एखाद्या सार्वजनिक प्रकल्पाचे पुनर्निर्माण करण्याची बहुधा ही पहिलीच वेळ आहे.''

मालाड आणि बोरीवली या दोन्ही ठिकाणी मोठ्या उत्साहाने प्रवासी व नागरीक उद्‌घाटन समारंभासाठी उपस्थित होते. याखेरीज उपमहापौर श्रीमती शैलजा गिरकर, माजी उपमहापौरद्वय श्री. रमेश मेढेकर व श्री. विनोद घेडिया, प्रभाग समिती अध्यक्षद्वय श्री. प्रवीण शहा व श्री. शिवकुमार झा, नगरसेवकद्वय श्री. मोहन मिठबावकर व श्री. दिलीप पटेल, नगरसेविकाद्वय श्रीमती विद्या ठाकुर व श्रीमती भारती केणी शृंगारपुरे, तसेच श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री अतुल भातखळकर, जयप्रकाश ठाकुर, करुणाशंकर ओझा, जगदीश पटेल, दिलीप पंडीत, अॅड. जयप्रकाश मिश्रा, श्रीकांत पांडे, शांतीभाई चौहान, सुरेंद्र विकल, आदी नेते उपस्थित होते.

मालाड येथे श्री. विनोद शेलार यांनी, तर बोरीवलीत श्री. गणेश खणकर यांनी कार्यक्रमाचे सूत्र संचालन केले. बसस्थानकांचे वास्तू विशारद श्री. नितीन प्रधान, कंत्राटदार श्री. सज्जन पवास व श्री. श्रषीकेश कटके व विनामूल्य सेवा देणारे रंगारी श्री. शेट्ये यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

**(अध्यक्ष)करीता**